आपलं महानगर | My महानगर.com
Tuesday, July 26, 2022 27 ᶜ Mumbai

# प्रजाच्या टॉप पाचमध्ये भाजपच्या तीन, शिवसेना, काँग्रेसच्या एका आमदाराची बाजी

प्रजा फाऊंडेशनतर्फे मंगळवारी ‘मुंबईतील आमदारांचे प्रगती पुस्तक’ अहवाल जाहीर करण्यात आला. या अहवालात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या टॉप पाचमध्ये भाजपच्या तीन, शिवसेना, काँग्रेसच्या एका आमदारांची बाजी मारली आहे. या पाच आमदारांमध्ये, काँग्रेसचे आ.अमीन पटेल प्रथमस्थानी, भाजपचे आ. पराग आळवणी दुसऱ्यास्थानी, शिवसेना आ.सुनील प्रभू तिसऱ्यास्थानी आहेत. या टॉप पाचमध्ये, भाजपचे आ.अमित साटम व आ.अतुल भातखळकर यांचाही समावेश आहे.

मात्र तळाच्या पाच आमदारांमध्ये शिवसेनेचे आ.रवींद्र वायकर, शिवसेनेचे (आता शिंदे गट) प्रकाश सुर्वे, भाजपचे आ. राहुल नार्वेकर, आ.मंगलप्रभात लोढा आणि काँग्रेसचे आ. झिशान सिद्दीकी यांचा समावेश आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने मुंबईतील आमदारांनी त्यांच्या वैधानिक आणि संविधानिक जबाबदाऱ्यांची पूर्तता कशा प्रकारे केली याचे मूल्यांकन या प्रगती पुस्तकात केले आहे. त्यांच्या कामगिरीनुसार आमदारांची श्रेणी ठरवली असल्याची माहिती प्रजाच्या वतीने देण्यात आली.

कोरोनाकाळात अधिवेशन सत्रे कमी झाल्याने वार्षिक प्रगती पुस्तकाऐवजी हिवाळी अधिवेशन २०१९ ते पावसाळी अधिवेशन २०२१ या दोन वर्षांचे हे एकत्रित प्रगती पुस्तक काढले असल्याचे प्रजातर्फे सांगण्यात आले. कोरोना -१९ महामारीच्या काळात २०२० मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे कामकाज केवळ १८ दिवस झाले तर टाळेबंदीनंतर (२४ मार्च २०२०) नंतर केवळ चार दिवस झाले.

वास्तविक, कोरोनाचा प्रारंभ झाल्यापासून ते आजपर्यंत त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रांवर झाला आहे. त्याचप्रमाणे, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांना त्याचा सर्वाधिक फटका बसला आहे. या दोन विषयांकडे आपल्या विधीमंडळाने अधिक लक्ष देण्याची गरज असल्याची सूचना प्रजातर्फे करण्यात आली आहे.

**Link:**https://www.mymahanagar.com/maharashtra/praja-foundation-release-report-card-know-which-mlas-are-top-five/463368/